॥श्री॥

२।९।२०२३
पुणे.

डॉ. सौ. जाई केळकर,

सप्रेम नमस्कार.

आज मला लिहावेसे वाटले. आपल्या हाताचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. दहा - बारा मिनीटांत डोळ्याचे ऑपरेशन म्हणजे अचंबा वाटला. आपल्याला ही भगवंताची देन आहे. ईश्वरीकृपा म्हणावी वाटते. असेच आपले हाताचे सामर्थ्य वृध्दिंगत होवो असे वाटते.

आपण मला चांदण्यासारखे डोळे दिलेत. आता मी दूरदूरचे पाहू शकेन, खूप खूप वाचू शकेन. मी आपली सदैव ऋणी राहीन.

हॉस्पीटलची स्वच्छता वाखाणण्याजोगी आहे. आपला स्टाफ सौजन्यशील आहे. व प्रेमभावी आहे. त्यांची मी आभारी आहे.

माझा भाऊ श्री. मोहन केळकर यांमुळे आपल्या भेटीचा योग आला.

आपली,
माणिक सोमण.